ePaper

महाराष्ट्रात लाल परीची चाके थांबली, एसटी कर्मचारी संपावर

‖ वर्ष - 8 । अंक - 57 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ‖ मंगळवार, दिनांक 03 सप्टेंबर 2024 ‖ पुणे आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews



## आतील पानांत


- बॅडमिंटनपटूंची शानदार कामगिरी
- रिचानं बॉलीवूडवर साधला निशाणा
- महिलांना तक्रार करण्यास भाग पाडू नका
- मणिपूरमधून सैन्य मागे घ्या!


## देदीप्यमान मराठी स्वराज्यात वावरत असल्याचा अनुभव पुणेकारांना मिळणार

# ऐतिहासिक ठिकाणांना 'हेरिटेज लूक'!

## पुणे महानगरपालिकेने खासगी कंपन्यांकडून मागविले प्रस्ताव

। पुणे । महाईन्यूज

**ग्रामदैवत कसबा गणपती, लाल महाल, शनिवारवाडा, नानावाडा, महात्मा फुले मंडई, तुळशीबाग या पुण्याची ऐतिहासिक ओळख असलेल्या ठिकाणांना आता 'हेरिटेज लूक' प्राप्त होणार आहे. या ठिकाणांच्या परिसरातील रस्ते, साजरा होणारा उत्सव, बस आणि मेट्रो स्थानक, दुकानांवरील पाट्या यांना तत्कालीन रूप देण्यात येणार असून, शहराच्या मध्यभागातून फिरताना शिवकाळ आणि पेशवाईतील पुण्याची अनुभूती नागरिकांना घडणार आहे. देदीप्यमान मराठी स्वराज्यात वावरत असल्याचा अनुभव नागरिक घेऊ शकतील.**



पुणे महापालिकेने या प्रकल्पाबाबत खासगी कंपन्यांकडून प्रस्ताव (रिक्वेस्ट फॉर प्रपोझल) मागितले असून, तीन कंपन्यांकडून प्रस्ताव सादर झाले आहेत. या प्रस्तावांची छानणी झाल्यानंतर त्याबाबतचा पुढील निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती महापालिकेचे वाहतूक नियोजनकार निखिल मिजार यांनी सांगितले. पुणे शहराचा ऐतिहासीक वारसा मोठा आहे. शिवराय आणि राजमाता जिजाऊंनी सोन्याच्या नांगर फिरवलेल्या पुण्यनगरीतून पेशवाईत देशाची सूत्रे फिरवली जात होती. हा सर्व काळ पुन्हा एकदा पुणेकरांना अनुभवता यावा यासाठी टिळक चौक (अलका चौक) ते क्वार्टर गेट चौक, सिमला ऑफिस चौक, शनिवारवाडा, कसबा गणपती, लाल महाल, नाना वाडा, श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिर, मंडई, तुळशीबाग आणि विश्रामबागवाडा या परिसराला 'हेरिटेज लूक' देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे


अत्यंत वर्दळीच्या असलेल्या या परिसराला हेरिटेज लूक देताना नागरिकांना पायी चालणे सुलभ व्हावे, या दृष्टीने रस्ते, पदपथ तयार करण्यात येणार आहे. याशिवाय या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. या परिसरात असलेले हॉकर्स, होर्डिंग्ज, दुकानांवरील पाट्या या सगळ्यांना विशिष्ट 'थीम'मध्ये करण्याचा प्रस्ताव आहे त्यासाठी हे काम देण्यात येणाऱ्या कंपनीने या सर्व परिसराचे छोट्या-मोठ्या दुकांनासह सर्वेक्षण करणे अपेक्षित असल्याचे

> "प्रस्ताव सादर करणाऱ्या कंपन्यांनी देशभरात अशा प्रकारे विकास करण्यात आलेल्या तीन 'हेरिटेज साईट'चा 'केस स्टडी' सादर करणे बंधनकारक केले आहे. यामुळे महापालिका प्रशासनास या सर्व परिसराचा विकास करताना अपेक्षित बदलांचा अंदाज साधता येणार आहे. महापालिका प्रशासनाने शहराच्या मध्यवर्ती भागाला 'हेरिटेज लूक' देण्यासाठी प्रस्ताव मागवले होते. प्रशासनास तीन प्रस्ताव सादर झाले असून, त्यावर पुढील निर्णय घेण्यात येणार आहेत. **- निखिल मिजार,**
> वाहतूक नियोजन अधिकारी

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा "सारथी" देशात "सिल्व्हर अॅवॉर्ड" चा मानकरी

## महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आज पुरस्कार स्विकारणार

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।






चिंचवड महानगरपालिका व स्मार्ट सिटीच्या "पीसीएमसी स्मार्ट सारथी" या प्रकल्पाला केंद्र शासनाचा 'ई-गव्हर्नन्स स्कीम २०२३-२४' अंतर्गत डिस्ट्रीक्ट लेव्हल इनिशिएटीव्ह्ज इन ई-गव्हर्नन्स'(ई-प्रशासनामध्ये जिल्हास्तरीय उपक्रम) या श्रेणीमध्ये सिल्व्हर पुरस्कार जाहीर झाला आहे. मुंबई येथे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हे मंगळवारी हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.

केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या वतीने हा पुरस्कार दिला जाणार आहे. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख पाच लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबई येथे होणाऱ्या २७ व्या राष्ट्रीय ई-प्रशासन परिषदेमध्ये (एसीईजी) महापालिकेला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

### पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन

महापालिकेच्या वतीने पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या माध्यमातून नागरिकांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेला राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात येणार आहे. महापालिकेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# आंदेकरांच्या हत्येचा थरार!

## वनराज आंदेकरांवर बहिणीच्या पतीकडून गोळीबार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची खळबळजनक घटना रविवारी रात्री नाना पेठेत घडली. रात्री उशिरा खासगी रुग्णालयात उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आंदेकर यांच्या मेहुण्याने त्यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार केल्याचे उघड झाले असून, या घटनेनंतर नाना पेठेत घबराट उडाली आहे.**



वनराज आंदेकर रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास नाना पेठेतील डोके तालीम परिसरात थांबले होते. त्या वेळी त्यांच्यावर हल्लेखोरांनी पिस्तुलातून पाच ते सहा गोळ्या झाडल्या. तसेच, कोयत्याने वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. नाना पेठ परिसरात आंदेकर टोळीचा दबदबा आहे. त्यामुळे वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती मिळाल्यानंतर परिसरात घबराट उडाली. वनराज यांच्यावर त्यांच्या बहिणीचा पती गणेश लक्ष्मण कोमकर, सोमनाथ सयाजी गायकवाड, तुषार कदम यांनी गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. कौटुंबिक वादातून कोमकरने गोळीबार केल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे. कोमकरने काही वर्षांपूर्वी शिवसेनेचे शहर प्रमुख रामभाऊ पारिख यांच्यावर ॲसीड हल्ला केला होता. २८ ऑगस्ट रोजी कोमकरने वनराज आंदेकर आणि त्यांच्या भावाविरुद्ध मालमत्तेच्या वादातून समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात धुसफूस सुरू होती.वनराज आंदेकर ( Vanraj Andekar) रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास नाना पेठेतील डोके तालीम परिसरात थांबले होते. त्या वेळी त्यांच्यावर हल्लेखोरांनी पिस्तुलातून पाच ते सहा गोळ्या झाडल्या. तसेच, कोयत्याने वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त निखिल पिंगळे यांनी दिली.नाना पेठेत वनराज आंदेकर (Vanraj Anderkar) आणि त्यांच्यासोबत एक जण उभे होते. यावेळी जवळपास सात दुचाकीवरुन जवळपास १४ ते १५ जण येतात आणि वनराज आंदेकर यांच्या अंगावर धावून जातात. यावेळी हल्लेखोरांच्या हातामध्ये बंदुका आणि कोयता असल्याचं सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येतंय. वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला करुन सर्व घटनास्थळावरुन पळ काढतात. पुण्याचे पोलीस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी सांगितलं की, रविवारी संध्याकाळी (१ सप्टेंबर) साडेनऊ वाजता दोन जण नाना पेठेतील परिसरात उभे होते. यावेळी काही अज्ञातांनी त्यांच्यावर गोळीबार केला, त्यात वनराज आंदेकर यांचा मृत्यू झाला आहे. वनराज आंदेकर यांचा मृतदेह ससून रुग्णालयामध्ये शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. त्यांच्यावर पाच राऊंड फायर करण्यात आले आणि तीक्ष्ण हत्यारानं त्यांच्यावर वार करण्यात आले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

### कोण होते वनराज आंदेकर?

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची खळबळजनक घटना रविवारी रात्री नाना पेठेत घडली. रात्री उशिरा खासगी रुग्णालयात उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. हे कृत्य नेमकं कशामुळे केलं आहे, हे अद्याप स्पष्ट आहे. मात्र, या आरोपींचा शोध आम्ही घेत आहोत. वनराज आंदेकर हे पुणे महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमधून नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्या अगोदर वनराज आंदेकर यांच्या मातोश्री राजश्री आंदेकर या २००७ आणि २०१२ या दोन वेळा नगरसेविका होत्या. वनराज आंदेकर यांचे चुलते उदयकांत आंदेकर हेही नगरसेवक होते.

# आरटीईच्या ३१ हजारांहून अधिक जागा रिक्त

## आरटीईप्रवेशासाठी आणखी एक संधी मिळणार?

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी तिसरी फेरी राबवली जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत ७३ हजार ६१२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून, अद्याप ३१ हजारांहून अधिक जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे.**



प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. सुरुवातीला २३ ते ३१ जुलै या कालावधीत प्रवेशासाठी संधी दिल्यानंतर आणखी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दोन फेऱ्या राबवण्यात आल्या. आता प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी तिसरी फेरी राबवण्यात येणार आहे.प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी म्हणाले, की दरवर्षी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी तीन ते चार फेऱ्या घेतल्या जातात. त्यानुसार आता तिसरी फेरी राबवली जाणार आहे.

### 93 हजार 9 विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर

त्याबाबतची माहिती जाहीर करण्यात येईल. प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना संधी देऊन प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी तिसरी फेरी राबवली जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत ७३ हजार ६१२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून, अद्याप ३१ हजारांहून अधिक जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला.

## छत्रपती संभाजी महाराज पुतळा प्रकरणात

# महाविकास आघाडीचा 'सेल्फ गोल'!

### शिल्पकार अनिल सुतार : ज्यांना शिल्पकलेचे ज्ञान नाही.. त्यांच्या टिकेवर काय बोलणार?

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये धर्मवीर संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच १४० फूटांचा पूर्णाकृती पुतळा "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" उभारण्याचे काम सुरू आहे. या पुतळ्याच्या मोजडीला भेगा पडल्याचा मुद्दा उपस्थित करीत महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी खळबळ उडवून दिली होती. मात्र, प्रख्यात शिल्पकार अनिल सुतार यांनी "ज्यांना शिल्पकलेचे ज्ञान नाही.." त्यांनी केलेले टिकेला काय उत्तर देणार? असा एका वाक्यात विषयावर पडदा टाकला आहे. परिणामी, छत्रपतींच्या अस्मितीचे राजकीय भांडवल करणाऱ्या पिंपरी-चिंचवड मविआचा 'सेल्फ गोल' झाला आहे.**




छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा पिंपरी-चिंचवडमध्ये व्हावा. यासाठी भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. हा पुतळा महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून साकारला जात आहे. मोशीतील ज्या प्रस्तावित जागेत हा पुतळा उभारला जातो आहे. पुतळ्याचे काम मार्च-२०२० मध्ये सुरू झाले. हा पुतळा भोसरी विधानसभा क्षेत्रामध्ये येतो. पुतळा उभारण्याची संकल्पना लांडगे यांची आहे. पण, लांडगे भाजपाच्या तिकीटावर निवडून आले आहेत. किंबहुना, शहरातील भाजपाचा 'स्ट्राँग' नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुतळ्याच्या कामावरुन भाजपा किंबहुना महायुतीला कोंडीत पकडण्याची रणनिती महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांनी आखली आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

दरम्यान, शहरातील प्रसारमाध्यमांतील काही मातब्बर पत्रकारांनी छत्रपती संभाजी महाराज पुतळा आणि त्याच्या कामाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे संशयाची सूई आणखी तीक्ष्ण झाली. तसेच, 'मेन स्ट्रिम' मिडियातील पत्रकारांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेतले. त्यामागील 'हेतू'ची शहानिशा केली आणि व्रतस्थ पत्रकारितेचा आदर्श घालून दिला. या प्रकरणामुळे शहरातील वातावरण कुलषित होणार नाही, याची काळजी घेतली. विश्वव्यापी आणि विश्वासार्ह माध्यम समुह असलेल्या 'टाईम्स ग्रुप'च्या एका युवा पत्रकाराने छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा ज्या कार्यशाळेत बनवला जातो.

त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली. पद्मश्री व पद्मभूषण शिल्पकार राम सुतार यांची कार्यशाळा उत्तरप्रदेशमधील गाझियाबाद येथे आहे. या कार्यशाळेत संबंधित पत्रकाराने राम सुतार यांचे चिरंजीव प्रतिथयश शिल्पकार अनिल सुतार यांची मुलाखत घेतली. त्यावेळी मालवण येथील घटना आणि पिंपरी-चिंचवडमधील पुतळ्याबाबत वस्तुस्थिती काय आहे? हे संपूर्ण महाराष्ट्रासमोर मांडले.

### ... असा आहे घटनाक्रम

**दिवस पहिला- शुक्रवार, दि. 30 ऑगस्ट :**

सुरूवातीला पुतळ्याच्या मोजडीला भेगा पडल्याचे वृत्त सायंकाळी प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल करण्यात आले. मालवणमधील पुतळा प्रकरण चर्चेत असल्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये तशीच परिस्थिती निर्माण होईल, असा दावा करण्यात आला. विषयाचे गांभीर्य लक्षात आल्याने महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी प्रसारमाध्यमांना अधिकृत खुलासा आणि प्रेसनोट सादर केली. किंबहुना, "चुकीच्या वृत्तांवर विश्वास ठेवू नका" असे आवाहन केले.

**दिवस दुसरा: शनिवार, दि. 31 ऑगस्ट :**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी पुतळ्याचे काम जिथे सुरू आहे आणि पार्ट जिथे ठेवलेले आहेत, तिथे सकाळी भेट दिली. 'फेसबूक लाईव्ह' केले आणि महायुतीच्या स्थानिक आमदारांना खडे बोलही सुनावले. "मला राजकारण करायचे नाही"असा दावा करताना "आयुक्तांनी भाजपाचे प्रवक्ते होवू नये" असा परस्परविरोधी सल्लाही दिला.

याच दिवशी दुपारी महाविकास आघाडीच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तुषार कामठे, भोसरीतील इच्छुक उमेदवार अजित गव्हाणे, सुलभा उबाळे आणि रवि लांडगे यांच्या पिंपरीतील इच्छुक उमेदवार सुलक्षणा शिलवंत प्रमुख उपस्थित होत्या. या पत्रकार परिषदेत अनेक आक्षेप नोंदवण्यात आले.

**दिवस तिसरा : रविवार, दि. 1 स्पटेंबर :**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी पुन्हा मोशी येथील पुतळ्याच्या ठिकाणी भेट दिली. तेथील साफसफाई करण्याबाबत महापालिका प्रशासनाला आवाहन केले. "आम्हाला या मुद्यावर राजकारण करायचे नाही, पण प्रशासनाने कार्यवाही केली नाही, तर तीव्र आंदोलन करु" असा इशारा दिला. विशेष म्हणजे, महाराजांच्या मोजडीला पाद्यपुजन करुन 'सेंटिमेंट' निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, भाजपाच्या आमदारांनी पाद्यपुजन केले होते. हे सांगायलाही कामठे विसरले नाहीत.

**दिवस चौथा : सोमवार, दि. 2 सप्टेंबर :**

शहरातील शिवप्रेमी, शंभू प्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर आंदोलन करणार आहेत, असा मॅसेज शहरात व्हायरल करण्यात आला. नियोजनाप्रमाणे भाजपा किंवा महायुतीविरोधी विचारांच्या संघटनांनी यामध्ये सहभाग घेतला.

---

## तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग: "तुमच्या रस्त्याचे काम झाले म्हणून समजा"!

### केंद्रीय मंत्री गडकरी यांचे आपुलकीचे आश्वासन, मावळचे आमदार सुनील शेळके यांनी घेतली दिल्लीत भेट

। मावळ । प्रतिनिधी : महाईन्यूज

**तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु झालेच असे समजून निश्चिंत रहा असे सुतोवाच केंद्रीय रस्ते विकास आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मावळचे आमदार सुनिल शेळके आणि महामार्ग कृती समितीच्या शिष्टमंडळाशी चर्चेदरम्यान रविवारी (ता.०१) नागपूर येथे दिले.**



अपघात,वाहतूक कोंडीसह गेली अनेक वर्षे रखडलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंदर्भात मावळचे आमदार सुनिल शेळके यांच्यासह तळेगाव- चाकण-शिक्रापूर महामार्ग कृती समितीचे उपाध्यक्ष दिलीप डोळस, सचिव अमीर प्रभावळकर, सदस्य संजय चव्हाण, गणेश बोरुडे आदींच्या शिष्टमंडळाने केंद्रीय रस्ते विकास आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानी रविवारी (ता.०१) सकाळी भेट घेऊन निवेदन दिल्यानंतर चर्चा केली.

कृती समितीकडून दिलेल्या निवेदनात प्रस्तावित एनएच ५४८-डी तळेगाव-चाकण-शिक्रापूर सहा पदरी उन्नत महामार्गाच्या (एलिव्हेटेड कॉरिडॉर) भूसंपादनाची सनद प्रसिद्ध करुन निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. सदर महामार्ग एमएसआईडीसीकडे (महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ) वर्ग करण्याच्या प्रक्रियेला गती द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

### रस्त्याच्या कामाला प्राधान्याने गती देणार

तसेच, प्रस्तावित उन्नत महामार्गाचे काम पुर्ण होण्यास लागणारा मोठा कालावधी पाहता,तोपर्यंत तात्पुरती उपयोजना आणि विशेष बाब म्हणून किमान अस्तित्वातील ५४ किलोमीटर रस्त्याचे अतिक्रमण काढून तळेगाव-चाकण-शिक्रापूर रस्त्याचे दुभाजकावर चौपदरीकरण करण्यात यावे असे निवेदन कृती समितीकडून गडकरी यांना देण्यात आले. त्यावर गडकरी यांनी सकारात्मकता दाखवत "तुमच्या रस्त्याचे काम झाले म्हणून समजा" असे गडकरी यांनी शिष्टमंडळाला सांगत सदर रस्त्याच्या कामाला प्राधान्याने गती देणार असल्याचे सांगितले.




# महायुतीलाही वेळ मिळेल

**महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जवळ येईल तसतसे महायुतीमध्ये अधिकाधिक गोंधळाचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे असे दिसते. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समस्त जनतेची माफी मागावी लागली. त्यामुळे महायुतीसाठी मोदींनाच लढावे लागत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.**



खरेतर लोकसभा निवडणुकीनंतर राज्यांतील निवडणूक स्थानिक मुद्दे आणि प्रादेशिक नेते यांच्या बळावरच लढवली पाहिजे याबाबत भाजपमध्ये फारसे दुमत नसावे; पण आता मोदींना थेट रणांगणात उतरावे लागले आहे. जम्मू-काश्मीर आणि हरियाणाच्या विधानसभा निवडणुकांमुळे महाराष्ट्रातील निवडणुकीची घोषणा लांबणीवर पडली. केंद्रीय निवडणूक आयोगाने आता हरियाणातील मतदान आणखी चार दिवस पुढे ढकलले आहे. त्यामुळे दोन्ही राज्यांचा निकाल ४ ऐवजी ८ ऑक्टोबरला जाहीर होईल. त्यानंतर आयोगाकडून महाराष्ट्र आणि झारखंड राज्यांचा पाहणी दौरा केला जाईल. त्यानंतर राज्यातील मतदानाच्या तारखांची घोषणा केली जाईल म्हणजे निवडणूक आणखी काही दिवस पुढे ढकलली जाईल. निवडणूक आयोग राज्यातील नेत्यांना प्रचारासाठी मुदत वाढवून देत आहे. त्याचा महायुती असो वा महाविकास आघाडी दोन्ही नेत्यांना लाभ होऊ शकतो. त्यांना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचता येईल ही बाब चांगलीच म्हटली पाहिजे. पण असा लाभ निदान महायुतीच्या नेत्यांना घेता येईल का याबाबत आज साशंकता निर्माण होऊ शकते.महाविकास आघाडी विरोधी पक्षात असल्यामुळे सरकारविरोधात आक्रमक होऊन प्रचार करणे अपेक्षित आहे. विरोधकांच्या हाती कोलीत न देणे हाच सत्ताधाऱ्यांचा पहिला बचाव असतो. सत्ताधाऱ्यांच्या चुकांवर विरोधकांना डाव पलटवता येतो. वास्तविक लोकसभा निवडणुकीत भाजपने केलेल्या चुकीचा 'इंडिया' आघाडीला कसा फायदा झाला हे दिसले आहे. 'संविधान बदलायचे असेल तर चारशे जागा जिंकून द्या', या भाजपमधील काही उतावळ्या नेत्यांच्या आवाहनामुळे काँग्रेसला भाजपविरोधात कोलीत मिळाले. या नेत्यांमुळे आणि 'मोदींची गॅरंटी' या प्रचारवाक्यामुळे भाजपची चारशे जागांपर्यंत होऊ शकणारी घोडदौड अडीचशेचाही पल्ला गाठू शकली नाही. लोकसभा निवडणुकीनंतरही काँग्रेसचा संविधानाचा मुद्दा भाजपला त्रास देत आहे. सातत्याने संविधानरक्षणावर बोलावे लागत आहे. थेट नोकरभरतीचा निर्णयही आरक्षणाच्या मुद्द्यावर केंद्र सरकारला मागे घ्यावा लागला, त्याहीवेळी याचे प्रत्यंतर आले आहे.लोकसभा निवडणुकीमध्ये अपेक्षित यश न मिळाल्याचे उदाहरण ताजे असताना राज्यात महायुतीकडून भाजपने केलेल्या चुका टाळण्याची गरज होती. मात्र महायुतीतील नेते नेमके हेच करताना दिसत आहेत. भाजप आणि शिंदे गटातील नेते अजित पवार गटाविरोधात आक्रमक झाले आहेत. शिवपुतळा कोसळण्याच्या घटनेनंतर सर्वात आधी अजित पवारांनी माफी मागून एक प्रकारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंविरोधात आघाडी उघडली. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला या घटनेचे गांभीर्य शिंदेंसह महायुतीतील नेत्यांच्या लक्षात आले नाही असे दिसते. महाराष्ट्रातील जनतेसाठी दैवत असलेल्या शिवरायांचा पुतळा कोसळतो पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नौदलाला आणि वाऱ्याला दोष देताना पाहायला मिळाले. भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी त्याची कानउघाडणी केल्यानंतर या नेत्यांना जनतेची माफी मागण्याचे भान आले असे दिसते. पण बूंद से गयी, वो हौद से नही आती, असे म्हणतात. तसेच काहीसे झाले. महायुतीतील नेत्यांना हे प्रकरण हाताळता आले नसल्याचे लक्षात आल्यावर आणि त्याचा मोठा फटका निवडणुकीत बसण्याची शक्यता दिसू लागल्याने मोदींना राज्यात येऊन जनतेची माफी मागावी लागली. जनतेकडे जाऊन मते मागण्यासाठी महायुतीकडे फार कमी मुद्दे असल्याचे दिसते. ही बाब भाजपमधील नेतेही मान्य करतीलयोजनेव्यतिरिक्त सत्ताधाऱ्यांकडे कोणताही सकारात्मक मुद्दा नसल्याचे चित्र दिसू लागले. त्यामुळे श्रेय घेण्यासाठीदेखील महायुतीमध्ये चढाओढ होऊ लागली.

## संपादकीय »

### ते अवघें बरें...

***अर्थगती ७.२ टक्के दराने वाढण्याचा अंदाज रिझर्व्ह बँकेने वर्तवूनही प्रत्यक्षात कृषी, सेवा, दैनंदिन उपभोग या क्षेत्रांच्या पीछेहाटीसह हे भाकीत हुकले...***

भाकिते, पूर्वानुमान यांचे अर्थकारणात मोठे महत्त्व. कोणत्याही वित्तीय वा पतधोरणाला आकार देताना अंदाज-भाकिते आणि त्यावर आधारित गृहीतकेच कामी येतात. म्हणून या अंदाज, भाकितांचे धोरणकर्त्यांना ममत्व आणि कौतुक स्वाभाविकच. मात्र त्याचेच स्तोम माजवले जाऊ नये. व्यावसायिक म्हटले जाणाऱ्या तज्ज्ञांचे, अगदी रिझर्व्ह बँकेचे निष्णात भाकीतकारही ज्यात आले, त्यांनी व्यक्त केलेल्या कयास-भाकितांचेच पाहा. अलीकडे त्यांचे विचारभ्रमण नेमके कोणत्या गस्तीटापूवर सुरू आहे, याचा विचार करता अचंबा वाटावा अशी स्थिती आहे. ताजा संदर्भ हा शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या एप्रिल-मे-जून या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने साधलेल्या वाढीच्या आकडेवारीचा आहे. या तिमाहीत अर्थगती ७.२ टक्के दराने वाढेल असा रिझर्व्ह बँकेचा कयास होता.

मुंबई उच्च न्यायालयाचे गेल्या आठवड्यातील दोन निर्णय – किंबहुना काही गोष्टी यंत्रणांनीच निर्णायक ठरवाव्यात, याबाबत दिलेले सूचनावजा आदेश- सध्या विशेष चर्चेत आहेत. हे निर्णय थेट अमुक काही तरी करू नका किंवा करा, असे सांगणारे नाहीत, तर 'यंत्रणांनी हे केले पाहिजे किंवा करावे,' असे सांगणारे आहेत.

# राज्य कायद्याचे की अस्मिताकारणाचे?



एका प्रकरणात तर न्यायालयाने असे म्हटलेच आहे, की 'आम्ही कोणताही तडकाफडकी निर्णय घेऊ इच्छित नसून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे (अंमलबजावणी यंत्रणांनी) कृपया काटेकोर पालन करावे, असे सांगण्यावर भर देऊ इच्छितो.' यंत्रणांना दिलेल्या सूचना त्यांनी पाळल्याच नाहीत किंवा यंत्रणांनी त्यांच्या 'सदसद्विवेक बुद्धी'ला अनुसरून त्याप्रमाणे काही निर्णय घेतले, तर त्यांच्या परिणामांबाबत काय, असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे, ही खरी यातील बिनउत्तराची कहाणी.प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती विसर्जनानंतर पर्यावरणास घातक ठरू शकतात, म्हणून अशा मूर्तींच्या निर्मितीबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२० मध्ये मार्गदर्शक सूचना काढल्या. त्यानुसार अशा मूर्ती तयार करण्यावरच यंत्रणांनी बंदी घालणे अपेक्षित होते. मात्र, ते न झाल्याने मातीपासून मूर्ती तयार करणारे काही मूर्तिकार आणि काही नागरिकांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली. त्यावर निर्णय देताना न्यायालयाने राज्य सरकारला सुनावले की, 'सर्व मंडळांना सक्त अटींच्या अधीन राहण्याचे, तसेच प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून तयार केलेली मूर्ती न वापरण्याचे आदेश सर्व महापालिका देतील, याची खातरजमा राज्य सरकारने करावी'. हा निर्देश देणाऱ्या न्यायालयाने येत्या गणेशोत्सवात प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर सरसकट बंदी आहे, असा थेट आदेश मात्र दिलेला नाही. दुसरे प्रकरण आहे, ते जैन धर्मात पवित्र मानल्या जाणाऱ्या पर्युषण पर्वाच्या काळात पशुहत्या आणि मांसविक्रीवर बंदी घालण्यासंदर्भातील. 'महाराष्ट्रातील महापालिकांनी याबाबत तातडीने विचार करून निर्णय घ्यावा,' अशी सूचना न्यायालयाने केली. मात्र, न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, या प्रकरणी उपस्थित केल्या गेलेल्या तर्कांच्या गुणवत्तेबाबत न्यायालयाने कोणतीही टिप्पणी केलेली नसून, यंत्रणांचा याबाबतचा निर्णय स्वतंत्र आणि कायद्याला धरून असावा. आता या दोन्हींबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांबद्दल. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या विसर्जनामुळे पाण्याचे प्रदूषण होते, त्यामुळे त्यावर बंदी असावी, अशी सूचना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे. ती तीन वर्षे अस्तित्वात असूनही त्याच्या अंमलबजावणीबाबत का निर्णय झाला नाही, हा प्रश्नच. तो न्यायालयानेही उपस्थित केला. मात्र, 'ही बंदी यंदापासून लागू करू नका,' एवढीच विनंती महापालिका आणि राज्य सरकारच्या वतीने युक्तिवाद करणाऱ्या वकिलांनी केली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिवाजी महाराजांनी सुरतची लूट केली

## फडणवीसांच्या विधानावर नारायण राणेंची प्रतिक्रिया

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटल्याचा इतिहास हा काँग्रेसने आपल्याला शिकवला वास्तविक महाराजांनी सुरत लुटलं नव्हतं, असं विधान महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, आता भाजपाचे नेते नारायण यांनी यासंदर्भात एका वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे.**





नारायण राणे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, मी इतिहास कार नसलो, तरी आतापर्यंत बाबासाहेब पुरंदरेंचा जो इतिहास वाचला, त्यानुसार शिवाजी महाराजांनी सुरतची लूट केली, अशी प्रतिक्रिया नारायण राणे यांनी दिली.पुढ बोलताना त्यांनी राजकोट किल्ल्यावर झालेल्या राड्यावरही भाष्य केलं. “दोन दिवसांपूर्वी मी राजकोट किल्ल्यावर गेलो होतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर तिथल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी तिथे गेलो होतो. तिथे पाहण्यासारखं काही नव्हतं, त्यामुळे मी लगेच तिथून निघालो. दुसऱ्या रस्त्याने निघालो होतो. मात्र त्याच वेळी आदित्य ठाकरे आणि त्यांचे लोक तिथे आले. मात्र मी एक आदेश दिला आणि त्यांना दोन तास तिथेच थांबवून ठेवलं. आदित्य ठाकरेंना खाली मान घालून परत जायला लावलं”, असे ते म्हणाले.दरम्यान, राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर महाविकास आघाडीने या घटनेचा निषेध करत जोडे मारो आंदोलन केलं होतं. या आंदोलनाबाबत देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली होती. “मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री असताना छत्रपती शिवरायांचा पुतळा बुलडोझरने हटवला. याची माफी काँग्रेस मागणार का? कर्नाटकात छत्रपती शिवरायांचा पुतळा तोडण्यात आला. त्याबद्दल काँग्रेस माफी मागणार का? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच काँग्रेसने शिकवलं की छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली. छत्रपती शिवरायांनी सुरत लुटलीच नाही. उलट सुरतच्या लोकांनी तिथे छत्रपतींचा पुतळा बसवला आहे. तरीही काँग्रेसने शिकवण दिली की छत्रपती शिवरायांनी सुरत लुटली. याची माफी काँग्रेस मागणार का?”

### शिवरायांचा पुतळा बुलडोझरने हटवला

“मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री असताना छत्रपती शिवरायांचा पुतळा बुलडोझरने हटवला. याची माफी काँग्रेस मागणार का? कर्नाटकात छत्रपती शिवरायांचा पुतळा तोडण्यात आला. त्याबद्दल काँग्रेस माफी मागणार का? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच काँग्रेसने शिकवलं की छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली. छत्रपती शिवरायांनी सुरत लुटलीच नाही. उलट सुरतच्या लोकांनी तिथे छत्रपतींचा पुतळा बसवला आहे.

असं देवेंद्र फडणवीस म्हणाले होते.नारायण राणे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, मी इतिहास कार नसलो, तरी आतापर्यंत बाबासाहेब पुरंदरेंचा जो इतिहास वाचला, त्यानुसार शिवाजी महाराजांनी सुरतची लूट केली, अशी प्रतिक्रिया नारायण राणे यांनी दिली.पुढ बोलताना त्यांनी राजकोट किल्ल्यावर झालेल्या राड्यावरही भाष्य केलं. “दोन दिवसांपूर्वी मी राजकोट किल्ल्यावर गेलो होतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर तिथल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी तिथे गेलो होतो. तिथे पाहण्यासारखं काही नव्हतं, त्यामुळे मी लगेच तिथून निघालो. दुसऱ्या रस्त्याने निघालो होतो. मात्र त्याच वेळी आदित्य ठाकरे आणि त्यांचे लोक तिथे आले. मात्र मी एक आदेश दिला आणि त्यांना दोन तास तिथेच थांबवून ठेवलं. आदित्य ठाकरेंना खाली मान घालून परत जायला लावलं”, असे ते म्हणाले.दरम्यान, राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर महाविकास आघाडीने या घटनेचा निषेध करत जोडे मारो आंदोलन केलं होतं. या आंदोलनाबाबत देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली होती.

# महाराष्ट्राचं भल व्हावं, असं वाटत असेल तर

## राणेंच्या विधानावरून वडेट्टीवारांचं शिंदे सरकारवर टीकास्त्र!

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रामगिरी महाराज यांच्या समर्थनार्थ अहमदनगर येथे काढलेल्या मोर्चात बोलताना भाजपाचे आमदार नितेश राणे यांना वादग्रस्त विधान केलं होतं. रामगिरी महाराजांविरोधात कुणी बोललं, तर मशिदीत घुसून मारू, असं ते म्हणाले होते. या विधानानंतर आता राजकीय वातावरण तापू लागलं असून विविध राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत.**

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी नितेश राणेंच्या या विधानावरून सत्ताधाऱ्यावर टीकास्त्र सोडलं आहे.विजय वडेट्टीवार यांनी एक्स या समाज माध्यमावर नितेश राणे यांचा व्हिडीओ पोस्ट करत सत्ताधाऱ्यावर टीका केली आहे. हे दंगलखोर कोण आहे? सरकारने यांच्यावर कारवाई का केली नाही? असा प्रश्न त्यांनी मुख्यमंत्र्यांना विचारला आहे. तसेच नितेश राणे यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.मुख्यमंत्री म्हणतात की विरोधकांना महाराष्ट्र अशांत ठेवायचा आहे, मग हे आमदार कोण आहेत? कोणत्या पक्षाचे आहेत? कोणाला घुसून मारण्याची





भाषा करत आहेत? राज्याचे गृहविभाग कुठं आहे? गृहमंत्री गप्प का? अद्याप कोणती कारवाई का नाही नाही?”, असे प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केले आहेत.पुढे बोलताना, “सरकार नितेश राणे यांच्यावर कारवाई करणार नाही आणि करूही शकत नाही. कारण सत्ताधाऱ्यांना अशा दंगलखोरांना तसेच गुंडांनाबरोबर घेऊन दंगल घडवायची आहे. हे लोक सत्तेसाठी महाराष्ट्र

### मशिदींमध्ये घुसून हत्या करू

“आमच्या रामगिरी महाराजांविरोधात कोणी काही बोलले तर आम्ही मशिदींमध्ये घुसून त्यांची निवडून निवडून हत्या करू”, असा थेट इशारा त्यांनी दिला होता. तसेच “रामगिरी महाराजांनी सिन्नरमधील प्रवचणात जो मुद्दा मांडला तो सतत मांडत रहावा, संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी आहे”, असेही ते म्हणाले होते.रामगिरी महाराज यांच्या समर्थनार्थ अहमदनगर येथे काढलेल्या मोर्चात बोलताना भाजपाचे आमदार नितेश राणे यांना वादग्रस्त विधान केलं होतं. रामगिरी महाराजांविरोधात कुणी बोललं, तर मशिदीत घुसून मारू, असं ते म्हणाले होते. आता राजकीय वातावरण तापू लागलं असून विविध राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत.

जाळायला निघाले आहेत”, असा आरोपही त्यांनी केला. “तुम्हाला महाराष्ट्राचे भल व्हावं, असे वाटत असेल तर या चिथावणीखोर आमदारावर कारवाई करा”, अशी मागणीही विजय वडेट्टीवार यांनी केली.अहमदनगरमध्ये रामगिरी महाराजांच्या समर्थनार्थ मोर्चा काढण्यात आला होता. या सभेला संबोधित करताना भाजपाचे आमदार नितीश राणे यांनी वादग्रस्त विधान केलं होतं.

# मणिपूरमधून सैन्य मागे घ्या!

## राजकुमार इमो सिंह यांनी केंद्रीय गृहमंत्री शाह यांना पत्र लिहिले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मणिपूरमधील हिसाचारांच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे आमदार राजकुमार इमो सिंह यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी मणिपूरच्या घटनांबाबत नाराजी व्यक्त केली आहे. सरकार मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात अपयशी ठरलं आहे, असं ते म्हणाले. तसेच केंद्र सरकारने पाठवलेले सैन्य मूकदर्शकपणे काम करत असून त्यांना परत बोलवावं, अशी मागणीही त्यांनी केली.**



### आम्ही त्या निर्णयाचं स्वागत करतो

पुढे या पत्रात त्यांनी मणिपूरमध्ये तैनात आसाम रायफलच्या तुकडीला परत बोलवण्याच्या निर्णयाचंही स्वागत केलं आहे. "आसाम रायफलच्या काही तुकड्यांना परत बोलवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आम्ही त्या निर्णयाचं स्वागत करतो. या तुकड्या राज्य सरकार आणि जनतेशी सहकार्य करत नव्हते. जर केंद्र सुरक्षा यंत्रणा राज्यात शांतता स्थापित करू शकत नसेल, तर त्यांना मणिपूरमध्ये तैनात करून काहीही उपयोग नाही", असे ते म्हणाले.सरकारकडे हस्तांतरित करणे यावेळी महत्त्वाचे असल्याचे मत राजकुमार इमो सिंह यांनी मांडलं आहे."केंद्र सरकारला मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारकडे एकत्रित आदेश सोपवावा लागेल आणि राज्यात शांतता आणि सामान्यता आणण्यासाठी कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार कार्य करण्याची परवानगी द्यावी लागेल.

गेल्या जवळपास दीड वर्षांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे तेथे कायम तणावाचं वातावरण आहे. या घटनांमध्ये शेकडो नागरिकांचा मृत्यूही झाला आहे. मणिपूरमधील परिस्थिती बघता काही महिन्यांपूर्वीच येथे लष्करालाही पाचारण करण्यात आलं होते. मात्र, तरीही हिंसाचाराच्या घटना सुरूच आहेत. रविवारी पश्चिम इम्फाळ जिल्ह्यात हिंसाचाराची घटना घडली आहे. या घटनांच्या पार्श्वभूमीवर राजकुमार इमो सिंह यांनी अमित शाह यांना पत्र लिहिलं आहे."मणिपूरमध्ये जवळपास ६० हजार सैन्य आहे. मात्र, ते राज्यात शांतता प्रस्तापित करण्यात अपयशी ठरले आहेत. येथे तैनात असलेले सैन्य मूकदर्शकपणे काम करत आहे. त्यामुळे त्यांना परत बोलवून राज्य पोलीस दलांकडे ही जबाबदारी द्यावी", अशी मागणी राजकुमार इमो सिंह यांनी अमित शाह यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. पुढे या पत्रात त्यांनी मणिपूरमध्ये तैनात आसाम रायफलच्या तुकडीला परत बोलवण्याच्या निर्णयाचंही स्वागत केलं आहे. "आसाम रायफलच्या काही तुकड्यांना परत बोलवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आम्ही त्या निर्णयाचं स्वागत करतो. या तुकड्या राज्य सरकार आणि जनतेशी सहकार्य करत नव्हते. जर केंद्र सुरक्षा यंत्रणा राज्यात शांतता स्थापित करू शकत नसेल, तर त्यांना मणिपूरमध्ये तैनात करून काहीही उपयोग नाही", असे ते म्हणाले.केंद्र सरकारने मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील युनिफाइड कमांड अथॉरिटी राज्य सरकारकडे हस्तांतरित करावी, असा प्रस्तावही त्यांनी पत्राद्वारे केंद्र सरकारसमोर मांडला आहे. तसेच हिंसेला आळा घालण्यात सध्याची व्यवस्था कुचकामी ठरली असून युनिफाइड कमांड निवडून आलेल्या सरकारकडे हस्तांतरित करणे यावेळी महत्त्वाचे असल्याचे मत राजकुमार इमो सिंह यांनी मांडलं आहे."केंद्र सरकारला मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारकडे एकत्रित आदेश सोपवावा लागेल आणि राज्यात शांतता आणि सामान्यता आणण्यासाठी कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार कार्य करण्याची परवानगी द्यावी लागेल", असं त्यांनी पत्रात म्हटलं आहे. गेल्या जवळपास दीड वर्षांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे तेथे कायम तणावाचं वातावरण आहे. या घटनांमध्ये शेकडो नागरिकांचा मृत्यूही झाला आहे. मणिपूरमधील परिस्थिती बघता काही महिन्यांपूर्वीच येथे लष्करालाही पाचारण करण्यात आलं होते. मात्र, तरीही हिंसाचाराच्या घटना सुरूच आहेत. पश्चिम इम्फाळ जिल्ह्यात हिंसाचाराची घटना घडली आहे. या घटनांच्या पार्श्वभूमीवर राजकुमार इमो सिंह यांनी अमित शाह यांना पत्र लिहिलं आहे."मणिपूरमध्ये जवळपास ६० हजार सैन्य आहे. मात्र, ते राज्यात शांतता प्रस्तापित करण्यात अपयशी ठरले आहेत. येथे तैनात असलेले सैन्य मूकदर्शकपणे काम करत आहे. त्यामुळे त्यांना परत बोलवून राज्य पोलीस दलांकडे ही जबाबदारी द्यावी", अशी मागणी राजकुमार इमो सिंह यांनी अमित शाह यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

# महिलांना तक्रार करण्यास भाग पाडू नका

## पत्रकार, वकीलांसह 70 जणांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलं पत्र!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मल्याळम सिनेसृष्टीतील महिलांवरील लैंगिक अत्याचाराचा गंभीर प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला. न्यायमूर्ती के हेमा समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर लैंगिक अत्याचाराची अनेक प्रकरणे समोर आली. यासाठी केरळ सरकारने विशेष तपास पथकही स्थापन केले. दरम्यान, ७० हून अधिक सिनेसृष्टीतील कलाकार, लेखक, वकील, पत्रकार आणि कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांना पत्र लिहिले आहे.**



### मानसिक आरोग्याला प्राधान्य

९ ऑगस्ट रोजी न्यायमूर्ती के हेमा समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर समोर आलेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांचा तपास करण्यासाठी केरळ सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले. एसआयटीच्या कार्यपद्धतीबाबत पत्रात म्हटले आहे, "समितीने आमच्या निर्दशनास आणून दिले की या क्षेत्रातील काही महिला ज्यांनी त्यांच्यावरील आपबिती सार्वजनिक आणि प्रसारमाध्यमांसोबत शेअर केली आहे त्यांना अधिकृत तक्रार दाखल करण्यासाठी पोलिसांकडून दबाव दिला जात आहे. हा एक गंभीर मुद्दा आहे. लैंगिक गुन्ह्यांच्या सर्व प्रकरणांमध्ये पीडित महिलांच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य दिलं पाहिजे.

महिलांना कायदेशीररित्या खटला चालवण्यास पोलिसांनी भाग पाडू नये, अशा आशयाचे पत्र लिहिण्यात आले आहे. विविध कारणांमुळे त्यांना कायदेशीर तक्रार करण्याची इच्छा नसेल. याबाबत माध्यमे आणि जनतेला संवेदनशील करण्याकरता पोलिसांनी काहीच प्रयत्न केले नाहीत. अशा पद्धतीने असंवेदनशीलता निर्माण झाल्याने आमचा विश्वास आहे की राज्यातील सध्याचे वातावरण महिलांच्या आरोपांमुळे तापत आहे. त्यामुळे, त्यांनी त्यांची तक्रार सार्वजनिक केल्यानंतर त्या पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा पर्याय निवडत नाहीत", असं पत्रात म्हटलं आहे. या पत्रावर ७२ जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यामध्ये अभिनेता प्रकाश राज, अपर्णा सेन, स्वरा भास्कर, गायिका चिन्मयी श्रीपाद, लेखिका-कार्यकर्त्या अरुंधती रॉय, ज्येष्ठ वकील वृंदा ग्रोव्हर आणि इंदिरा जयसिंग आणि मल्याळम लेखिका सारा जोसेफ, केआर मीरा आणि एनएस माधवन यांचा समावेश आहे.

# वर्ल्ड रेकॉर्ड फॉलोअर्सचा कतरिनाच्या नावावर!

अगदी काहीच दिवसांपूर्वी व्हॉट्सअॅप चॅनल हे नवीन फिचर व्हॉट्सअॅपवर समाविष्ट झालंय. या फिचर अंतर्गत असंख्य माध्यमांनी, सेलिब्रिटींनी स्वतःचं चॅनल उघडलं आहे. या चॅनलच्या माध्यमातुन आता असंख्य सेलिब्रिटी त्यांच्या आयुष्याबद्दलचे अपडेट्स शेअर करत असतात. अशातच अभिनेत्री कतरिना कैफने व्हॉट्सअॅप चॅनलवर उघडताच नवा रेकॉर्ड तिच्या नावावर केलाय. जाणुन घ्या सविस्तर. कतरीनाने व्हॉट्सअॅप चॅनल उघडताच तिचे 15.3 मिलियन फॉलोअर्स झाले. त्यामुळे कतरिना कैफ व्हॉट्सअॅप चॅनलची सर्वाधिक फॉलोअर्स असलेली अभिनेत्री ठरली. बॉलिवूड स्टार कैटरीना कैफने व्हॉट्सअॅप चॅनलवर एक उल्लेखनीय म्हणजेच 15 मिलीयन फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला आहे. असा रेकॉर्ड करणारी आणि व्हॉट्सअॅप चॅनलवर सर्वाधिक फॉलो केली जाणारी कतरिना सेलिब्रिटी ठरली आहे. अगदी व्हॉट्सअॅप कंपनीचे मालक मार्क झुकरबर्ग आणि गायक/ रॅपर बॅड बनी यासारख्या जागतिक व्यक्तींना तिने मागे यात मागे टाकलंय. बॉलीवूडमध्ये तिच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या कतरीना कैफने केवळ तिच्या अभिनयाने लाखो लोकांची मने जिंकली नाहीत तर तिच्या यशस्वी उद्योजकतेमध्येही ती कायमच एक पाऊल पुढे असते. व्हॉट्सअॅप चॅनलसाठी झालेले कतरिनाचे फॉलोअर्स हे तिचं किती फॅन फॉलोईंग आहे याचं उदाहरण म्हणून बघता येईल. कैटरीना



# रिचानं बॉलीवूडवर साधला निशाणा



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री रिचा चड्ढा ही तिच्या आक्रमक वक्तव्यासाठी ओळखली जाणारी सेलिब्रेटी आहे. गेल्या काही दिवसांपासून ती तिच्या परखड बोलण्यामुळे चर्चेत आली आहे. आता तिचा फुकरे ३ नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. त्याच्या प्रमोशनच्या दरम्यान तिनं केलेला खुलासा हा भलताच धक्कादायक आहे. फुकरे च्या अगोदरच्या चित्रपटांना देखील प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यानं बॉक्स ऑफिसवर समाधानकारक कमाईही केली होती. मृगदीप सिन्हा यांनी दिग्दर्शित केलेल्या फुकरे च्या तिसऱ्या पार्टची प्रेक्षकांना गेल्या अनेक दिवसांपासून प्रतिक्षा होती. रिचा चड्ढा,पंकज त्रिपाठी, पुलकित सम्राट या कलाकारांची जुगलबंदी या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. सोशल मीडियावर या चित्रपटाचा ट्रेलर, त्याचे बीटीएस विशेष लोकप्रिय होताना दिसत आहेत. त्यावर नेटकऱ्यांच्या आलेल्या कमेंट्स देखील भन्नाट आहेत. यासगळ्यात चित्रपटाचे प्रमोशन करण्यात व्यस्त असलेल्या रिचानं बॉलीवूडमधील त्या प्रकारावर सडेतोडपणे भाष्य केले आहे. ज्यामुळे पुन्हा नवा वाद तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नाकाच्या सर्जरीमुळे प्रियांकाचा चेहरा झाला होता विद्रूप

'गदर 2' चित्रपटाचे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी प्रियांका चोप्राच्या करिअरबद्दल सांगितले आहे. प्रियांकाने त्यांच्या 'द हीरो: लव्ह स्टोरी ऑफ अ स्पाय' या चित्रपटात काम केले होते. 2003 मध्ये रिलीज झालेला हा चित्रपट प्रियांकाचा पहिला बॉलिवूड चित्रपट होता. अनिल शर्मांने एका मुलाखतीत सांगितले की, प्रियांका चित्रपटसृष्टी सोडण्याच्या मार्गावर होती कारण त्या काळात तिला अनेक चित्रपटांमधून काढून टाकण्यात आले होते. याचे कारण होते प्रियांका चोप्राची प्लास्टिक सर्जरी. वास्तविक, हा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी प्रियांकाने तिच्या नाकावर शस्त्रक्रिया करून घेतली होती ज्यामुळे तिचे करिअर सुरू होण्यापूर्वीच संपुष्टात आले असते. अनिल शर्मा यांनी बॉलीवूड ठिकानाशी संवाद साधताना सांगितले की, प्रियंकासोबत मोठी दुर्घटना घडली. ती छान दिसत होती, मी तिला चित्रपटात साइन केले.




माझ्या पत्नीने स्वतः तिला मंदिराबाहेर साइनिंग अमाउंट दिली होती. त्यानंतर गदर चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर मी अमेरिका आणि युरोपला गेलो. जेव्हा मी दोन महिन्यांनी परत आलो तेव्हा मला दिसले की प्रियांकाने तिच्या नाकाची शस्त्रक्रिया करून घेतली कारण तिला ज्युलिया रॉबर्ट्ससारखे दिसायचे होते. हे मी वर्तमानपत्रात वाचले. माझ्या मनात विचार आला, प्रियांकाला असे करण्याची काय गरज होती, ती तशी सुंदर दिसत होती. अनिल शर्मा पुढे म्हणाले, काही दिवसांनी एका निर्मात्याने मला प्रियांकाचा शस्त्रक्रियेनंतरचा फोटो दाखवला. मी तिला अजिबात ओळखू शकलो नाही आणि विचारले - ही कोणती नायिका आहे? तो म्हणाला- प्रियांका. मी थक्क झालो. तिचा चेहरा पूर्णपणे काळा झाला होता, मला वाटले प्रियांकाने स्वतःचे काय केले? दुसऱ्या दिवशी मी प्रियांकाला भेटायला बोलावलं. ती आईसोबत मला भेटायला आली. प्रियांका आणि तिची आई रडत होती. प्रियांकाच्या नाकावर एक डाग पडलेल्या ऑपरेशनबद्दल तिने मला सांगितले. ती खूण अजूनही आहे. प्रियांकाने सांगितले की तिला बरे होण्यासाठी काही महिने लागतील त्यामुळे तिला अनेक प्रोजेक्ट्समधून काढून टाकण्यात आले आहे. मी प्रियांकाला विचारले- तू असे का केलेस? प्रियांकाने सांगितले की, ती सायनसच्या समस्येने त्रस्त होती जी तिच्यासाठी असह्य झाली होती. शस्त्रक्रिया चुक झाल्यामुळे प्रियंका इतकी नाराज झाली होती की तिने बरेलीला परत जाण्याचा निर्णय घेतला होता. अनिल शर्माने प्रियांकाला कठीण काळात साथ दिली. यशराज फिल्म्समध्ये काम करणाऱ्या एका दिग्गज मेकअप आर्टिस्टला फोन केला. त्या आर्टिस्टने माधुरी आणि श्रीदेवीसोबत होते.

त्यांनी मेकअप दीक्षित काम केले

# डान्स करत नवरदेवाकडे गेली परिणीती चोप्रा

राघव-परिणितीच्या लग्नाची एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये परिणीती राघवकडे पाहत त्यांच्याकडे जात आहे. परिणीतीचे भाऊ तिच्या जवळ येताच ती डान्स करायला लागते. आणि नंतर डान्स करत राघवकडे जाताना दिसत आहे. यादरम्यान राघवने परिणीतीच्या कपाळाचे चुंबन घेतले. राघव-नीती त्यांच्या ड्रीमी मोमेंटचा आनंद घेत आहेत. परिणीतीने नुकताच तिच्या सोशल मीडियावर एक किस्सा शेअर केला आहे. आजीची आठवण करून तिने लिहिले - माझ्या खास दिवशी तुझी



अनुपस्थिती मला जाणवली. चावीचा आयकॉन बनवून तुझा तुकडा माझ्याकडे असल्याचेही तिने सांगितले. तसेच सोशल मीडियावर लोकांना धन्यवाद असे लिहिले. लग्नानंतर परिणीती राघव यांच्यासोबत दिल्लीत आहे. तीन दिवसांपूर्वी आप खासदार राघव चड्ढा आणि बॉलिवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा यांचा उदयपूरच्या हॉटेल लीला पॅलेसमध्ये विवाह झाला. पिचोला तलावाच्या मध्यभागी असलेल्या ताज लेक पॅलेस येथून लग्नाची मिरवणूक हॉटेल लीला येथे पोहोचली.

# महिला बॅडमिंटनपटूंची शानदार कामगिरी!

## तुलसीमतीने रौप्यपदक तर मनीषाने पटकावले कांस्यपदक

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेच्या पाचव्या दिवशी रात्री भारताने १० मिनिटांत २ पदके जिंकली आहेत. एकीकडे तुलसीमती मुरुगेसनला बॅडमिंटनमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तिला महिला एकेरीच्या SU5 प्रकारातील अंतिम फेरीत चीनच्या यांग क्विक्सिया हिच्याकडून २१-१७, २१-१० असा पराभव स्वीकारावा लागला. दुसरीकडे याच गटात मनीषा रामदासने डेन्मार्कच्या कॅथरीनचा २१-१२, २१-८ असा सहज पराभव केला.**




विशेष म्हणजे पहिल्या फेरीच्या सामन्यापासून उपांत्य फेरीपर्यंत मुरुगेसनने एकही सेट गमावला नव्हता. आतापर्यंत तिने आपल्या तिन्ही प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत अंतिम फेरी गाठली होती. मात्र विजेतेपदाच्या लढतीत तिला चीनच्या खेळाडूने २१-१७, २१-१० अशा सरळ सेटमध्ये पराभूत केले. दुसरीकडे, मनीषाने आपला शानदार प्रवास सुरू ठेवत एकतर्फी विजय नोंदवत भारताला कांस्यपदक मिळवून दिले.१९ वर्षीय मनीषाला रोसेन्ग्रेनला पराभूत करण्यासाठी केवळ २५ मिनिटे लागली. मनीषाने संपूर्ण सामन्यात आपला दबदबा कायम राखला आणि विरोधी खेळाडूला एकही संधी दिली नाही. तिने पहिल्या सेटमध्येच आघाडी घेतली आणि १३ मिनिटांत सेट जिंकला. यानंतर १२ मिनिटांत दुसरा सेट जिंकून कांस्यपदक मिळवण्यात तिला यश आले. यासह पॅरालिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत पदक जिंकणारी मनीषा पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली. मात्र, लवकरच मुरुगेसनचाही या यादीत समावेश झाला. उपांत्य फेरीत मनीषाचा मुरुगेसनकडून पराभव झाला. पॅरालिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी मुरुगेसन ही पहिली भारतीय महिला आहे.

अंतिम फेरीत मुरुगेसनने चीनच्या खेळाडूला चांगले आव्हान दिले आणि लवकरच गुणसंख्या ४-४ अशी बरोबरीत आणली. एका क्षणी मुरुगेसनने दोन गुणांची आघाडीही घेतली होती, पण ही आघाडी तोडण्यात किउ जियाला यश आले. त्यानंतर चीनच्या खेळाडूने मुरुगेसनसमोर कडवे आव्हान उभे केले आणि सामना जिंकण्यास जास्त वेळ लागला नाही. भारताच्या पदकांची संख्या आता ११वर पोहोचली आहे. तलसीमती मुरुगेसन आणि मनीषा रामदास यांच्या अगोद नितीश कुमारने बॅडमिंटनच्या पुरुष एकेरी SL3 प्रकारात भारतासाठी सुवर्णपदक जिंकले होते. नितीश कुमारने पुरुष एकेरी SL 3 गटाच्या अंतिम फेरीत ग्रेट ब्रिटनच्या डॅनियल बॅटलीचा २१-१४, १८-२१, २३-२१ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले होते. पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये भारताचे हे एकूण दुसरे सुवर्णपदक होते.तलसीमती मुरुगेसन आणि मनीषा रामदास यांच्या अगोद नितीश कुमारने बॅडमिंटनच्या पुरुष एकेरी SL3 प्रकारात भारतासाठी सुवर्णपदक जिंकले होते. नितीश कुमारने पुरुष एकेरी SL 3 गटाच्या अंतिम फेरीत ग्रेट ब्रिटनच्या डॅनियल बॅटलीचा २१-१४, १८-२१, २३-२१असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले होते. पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये भारताचे हे एकूण दुसरे सुवर्णपदक होते. १९ वर्षीय मनीषाला रोसेन्ग्रेनला पराभूत करण्यासाठी केवळ २५ मिनिटे लागली. मनीषाने संपूर्ण सामन्यात आपला दबदबा कायम राखला आणि विरोधी खेळाडूला एकही संधी दिली नाही. तिने पहिल्या सेटमध्येच आघाडी घेतली आणि १३ मिनिटांत सेट जिंकला. यानंतर १२ मिनिटांत दुसरा सेट जिंकून कांस्यपदक मिळवण्यात तिला यश आले. यासह पॅरालिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत पदक जिंकणारी मनीषा पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली. मात्र, लवकरच मुरुगेसनचाही या यादीत समावेश झाला. उपांत्य फेरीत मनीषाचा मुरुगेसनकडून पराभव झाला. पॅरालिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी मुरुगेसन ही पहिली भारतीय महिला आहे. अंतिम फेरीत मुरुगेसनने चीनच्या खेळाडूला चांगले आव्हान दिले आणि लवकरच गुणसंख्या ४-४ अशी बरोबरीत आणली. एका क्षणी मुरुगेसनने दोन गुणांची आघाडीही घेतली होती, पण ही आघाडी तोडण्यात किउ जियाला यश आले. त्यानंतर चीनच्या खेळाडूने मुरुगेसनसमोर कडवे आव्हान उभे केले आणि सामना जिंकण्यास जास्त वेळ लागला नाही.भारताच्या पदकांची संख्या आता ११वर पोहोचली आहे. आतापर्यंत तिने आपल्या तिन्ही प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत अंतिम फेरी गाठली होती. मात्र विजेतेपदाच्या लढतीत तिला चीनच्या खेळाडूने २१-१७, २१-१० अशा सरळ सेटमध्ये पराभूत केले. दुसरीकडे, मनीषाने आपला शानदार प्रवास सुरू ठेवत एकतर्फी विजय नोंदवत भारताला कांस्यपदक मिळवून दिले.

### एका दिवसात तीन पदके जिंकली

पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेच्या पाचव्या दिवशी रात्री भारताने १० मिनिटांत २ पदके जिंकली आहेत. एकीकडे तुलसीमती मुरुगेसनला बॅडमिंटनमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तिला महिला एकेरीच्या SU5 प्रकारातील अंतिम फेरीत चीनच्या यांग क्विक्सिया हिच्याकडून २१-१७, २१-१० असा पराभव स्वीकारावा लागला. दुसरीकडे याच गटात मनीषा रामदासने डेन्मार्कच्या कॅथरीनचा २१-१२, २१-८ असा सहज पराभव केला यासह पॅरालिम्पिकमध्ये बॅडमिंटन स्पर्धेत पदक जिंकणारी मनीषा पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली. मात्र, लवकरच मुरुगेसनचाही या यादीत समावेश झाला.

# जय शाहांच्या चेअरमनपदाचा पाकिस्तानला फायदा

## जय शाह 1 डिसेंबरपासून आयसीसीचा पदभार स्वीकारणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शहा यांची काही दिवसांपूर्वी आयसीसीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत. यानंतर आशियाई क्रिकेट परिषदेच्या (एसीसी) प्रमुखपदी त्यांच्या बदलीचे नावही पुढे येत आहे.**




आयसीसी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच त्यांना बीसीसीआयच्या सचिवपदच नव्हे तर एसीसी अध्यक्षपदही सोडावी लागणार आहे. ज्यामुळे पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना मोठी जबाबदारी मिळणार आहे.पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्वी हे एसीसीचे नवे अध्यक्ष होण्याच्या शर्यतीत आघाडीवर आहेत. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तात दावा करण्यात आला आहे की नक्वी हे जय शाह यांच्या जागी एसीसीचे नवे प्रमुख म्हणून नियुक्ती होतील. या वर्षाच्या अखेरीस या निर्णयाची अधिकृत घोषणा केली जाईल.“या वर्षाच्या अखेरीस जेव्हा एसीसीची बैठक होईल, तेव्हा नक्वी दोन वर्षांच्या कालावधीसाठी पुढील अध्यक्ष असतील याची पुष्टी केली जाईल,” असे पीटीआयच्या सूत्राने सांगितले. जय शहा पद सोडल्यानंतर पीसीबी प्रमुख पदभार स्वीकारतील.आतापर्यंत ४ भारतीयांनी आयसीसी प्रमुखपद भूषवले आहे. जगमोहन दालमिया १९९७-२००, शरद पवार २०१०-२०१२, एन श्रीनिवासन २०१४-१५ आणि शशांक मनोहर २०१५-२०२० पर्यंत आयसीसीचे अध्यक्ष होते. जय शाह आता आयसीसीचे नवे बॉस बनणारे पाचवे भारतीय ठरले आहेत. आयसीसी चेअरमन पदासाठी अर्ज करणारे एकमेव अर्जदार जय शाह होते. यासह जय शाह यांची अध्यक्षपदासाठी बिनविरोध निवड झाली. येत्या १ डिसेंबर २०२४ पासून जय शाह आयसीसीच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारतील.

### कठोर परिश्रमाने प्रभावित केले

जय शाहांचा क्रिकेट व्यवस्थापनातील प्रवास २००९ मध्ये सुरू झाला, जेव्हा त्यांनी जिल्हा स्तरावर सेंट्रल क्रिकेट बोर्ड अहमदाबाद (सीबीसीए) मध्ये काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर ते गुजरात क्रिकेट असोसिएशन (जीसीए) मध्ये सामील झाले आणि २०१३ मध्ये संयुक्त सचिव झाले. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव म्हणून काम करताना जय शाह यांनी आपल्या कार्यक्षमतेने आणि कठोर परिश्रमाने सर्वांना प्रभावित केले.